महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

---

जा.क्र.तंशिविकापु/विवि-५/सु.पं.लोकोत्सव/२०२३/ ७८७
दिनांक : 15 FEB 2023

प्रति,
संचालक / प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या अधिपत्याखालील
सर्व शासकीय / अशासकीय अनुदानित व विनाअनुदानित
तंत्रनिकेतने, अभियांत्रिकी / औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये
व इतर तत्सम व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणाया संस्था
(पुणे विभाग पुणे)

**विषय :- सुमंगलम पंचमहाभूत लोकोत्सव - व्यावसायिक महाविद्यालयांचा सहभागाबाबत.**

संदर्भ :- १).मा.जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडील पत्र क्र.कार्या-२/प्रशा/कणेरी/२०२२, दि. २९.१२.२०२२.
२).शिक्षण विभाग (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागाळा पार्क, कोल्हापूर यांचे पत्र क्रमांक जानं/कोजिप/माध्य/वशि-१३/२०६/२०२३, दि. १६.०१.२०२३
३).शिक्षण विभाग (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागाळा पार्क, कोल्हापूर यांचे पत्र क्रमांक जानं/कोजिप/माध्य/वशि-१३/२८४/२०२३, दि. १६.०१.२०२३

उपरोक्त विषयाचे संदर्भ क्र. ३ चे पत्र या कार्यालयास प्राप्त झाले असून, सदर पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यांत येते की, परमपूज्य स.स.श्री. काडसिध्देश्वर स्वामीजी सिध्दगिरी मठ कणेरी यांच्या मार्गदर्शनाखाली श्री क्षेत्र सिध्दगिरी मठ कणेरी महासंस्थान, कोल्हापूर येथे दि. २० ते २६ फेब्रुवारी, २०२३ या कालावधीत सुमंगलम हा पंचमहाभूत महोत्सव आयोजित करण्यात येणार आहे. देशविदेशातून या महोत्सवात सामाजिक, सांस्कृतिक, तसेच शैक्षणिक अशा सर्व क्षेत्रातील लाखो लोकांना आमंत्रित केले आहे. यामध्ये तंत्रशिक्षण क्षेत्राचा मोठा सहभाग असणार आहे. (सुलभ संदर्भाकरीता संदर्भ क्र. ३ चे पत्र सोबत जोडले आहे).

भारतीय परंपरा आणि जीवन शैली विशेष करुन ग्रामीण समाज जीवन इत्यादींमध्ये असणा-या पंचमहाभौतिक सिध्दांतांना पुस्तक, चित्रपट, मूर्तिकला वगैरे विविध माध्यमातून संकलित करणे, सध्या शिक्षण घेणा-या तरुणांना व समाजातील सर्व लोकांना भारताच्या पारंपारिक ज्ञानाची तसेच त्या संबंधित विविध संशोधन कार्याची ओळख करुन देणे, पारंपारिक ग्रामीण समाजाला वेज्ञानिक दृष्टिकोन आणि आधुनिक कार्यपध्दती याबाबत अवगत करणे हा या लोकोत्सवाचा हेतू आहे. याकरीता आपल्या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी या महोत्सवात प्रत्यक्ष सहभागी असणे आवश्यक आहे.

तरी या पत्राव्दारे आपणास सूचित करण्यात येते की, सदर महोत्सवात सहभागी होण्यासाठी आपल्या संस्थेतील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना प्रोत्साहित करावे व तिथे उपलब्ध होणा-या उपक्रमांचा लाभ घ्यावा.

सोबत : संदर्भ क्र. ३ चे पत्र

(डॉ.द.व्यं.जाधव)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : श्री. सं. बा. शिंदे, प्रोग्रामर यांना, या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्याकरीता.

| | | |
|---|---|---|
| | शिक्षण विभाग (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागाळा पार्क, कोल्हापूर | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |
| | नं.कोजिप/शिक्षण/माध्य/वशि-१३/२८४/२०२३<br>दिनांक :- २४/१/२०२३<br>ईमेल- coseckop@gmail.com / madhyamikkolhapur@gmail.com | |

प्रति,
प्राचार्य / मुख्याध्यापक
माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय (सर्व) जि.कोल्हापूर

**विषय - सुमंगलम पंचमहाभूत लोकोत्सव - माध्यमिक शाळांच्या सहभागाबाबत.**

**संदर्भ -** १) मा. जिल्हाधिकारी, कोल्हापूर यांचेकडील पत्र क्र. कार्या-२/प्रशा/कणेरी/२०२२, दि. २६/१२/२०२२.
२) या कार्यालयाकडील जानं/कोजिप/माध्य/वशि-१३/२०६/२०२३,दि. १६/१/२०२३.

परमपूज्य स.स. श्री. काडसिध्देश्वर स्वामीजी सिध्दगिरी मठ कणेरी यांच्या मार्गदर्शनाखाली श्री क्षेत्र सिध्दगिरी मठ कणेरी महासंस्थान कोल्हापूर येथे दि. २० ते २६ फेब्रुवारी २०२३ या कालावधीत सुमंगलम हा पंचमहाभूत महोत्सव आयोजित करण्यात येणार आहे. देशविदेशातून या महोत्सवात सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक तसेच शैक्षणिक अशा सर्व क्षेत्रातील लाखो लोकांना आमंत्रित केले आहे. यामध्ये शिक्षण क्षेत्राचा मोठा सहभाग असणार आहे. यासाठी लाखो विद्यार्थ्यासह शिक्षण क्षेत्रातील सर्वांचे महोत्सवात प्रत्यक्ष सहभागी असणे आवश्यक आहे.

पंचमहाभूत लोकोत्सव याबाबतची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे.

**पंचमहाभूत मोहिम -** प्राचीन भारतीय ज्ञान परंपरेनुसार संपूर्ण ब्रम्हांडाची रचना ज्या पंचतत्वा पासून म्हणजे आकाश, वायू, अग्नि, जल आणि पृथ्वी या पासून झाली त्यांना पंचमहाभूत म्हणून ओळखले जाते. जेव्हा निसर्गात हे पाच तत्व संतुलित स्थितीत व शुध्द स्वरुपात असतील तेव्हा सर्व प्राणिमात्रांचे जीवन सुखमय राहील. पंचमहाभूतांच्या या संकल्पनेला प्राचीन काळापासून सर्वच पंथानी स्विकारले आहे. पंचमहाभूत अशी एक गुरुकिल्ली आहे ज्याद्वारे आम्ही निसर्गाचे रहस्य समजू शकतो व समजावू शकतो. महर्षी चरक यांनी याच पंचमहाभूतांच्या द्वारे आयुर्वेदाचे सिध्दांत शिकवले आणि याच पंचमहाभूतांच्या द्वारे जपानचे महायोध्दा मियामातो मुस्सास्सीने तलवारबाजीच्या अभिनव क्लृप्त्या शिकवल्या. दि. ३ एप्रिल २०२२ रोजी दिल्ली जवळील पुसा संस्थामध्ये देशातील बुध्दिप्रामाण्यवादी विद्वान, समाजसेवी संस्था, केंद्रीय मंत्रालयाचे संबंधित मंत्री, विविध धर्मगुरु यांनी एकत्र येवून विचारमंथन केले व त्यात सर्वांचे एकमत झाले. याला पुन्हा एकदा आधुनिकतेची जोड देत पंचमहाभूतांच्या विविध सिध्दांतांना समजून त्याद्वारे जागतिक समस्यांचे निराकरण करण्याचा प्रयत्न करणे आजच्या काळाची गरज आहे. सध्या संपूर्ण देशभरात विविध ठिकाणी पंचमहाभूतांच्या पाच घटकांवर आधारित कार्यक्रम होत आहेत. या दिशेने पुढाकार घेत सिध्दगिरी मठाने फेब्रुवारी २०२३ ला मठाच्या विस्तीर्ण परिसरात पंचमहाभूतांवर आधारित विशाल भव्य उत्सव करण्याचे योजिले आहे. त्याद्वारे समाजाच्या सर्व स्तरातील लोकांना पंचमहाभूतांच्या प्रति जागृत व सक्रिय करण्यात येईल. या उत्सवाच्या प्रयोजनाद्वारे सिध्दगिरी मटात पुढील लक्ष्य साध्य करण्यात येईल.

**या लोकोत्सवाचा हेतू -**
भारतीय परंपरा आणि जीवन शैली (विशेष करुन ग्रामीण समाज जीवन) इत्यादींमध्ये असणाऱ्या पंचमहाभौतिक सिध्दांतांना पुस्तक, चित्रपट, मूर्तिकला वगैरे विविध माध्यमांतून संकलित करणे.

सध्या शिक्षण घेणाऱ्या तरुणांना व समाजातील सर्व लोकांना भारताच्या पारंपारिक ज्ञानाची तसेच त्या संबंधित विविध संशोधन कार्याची ओळख करुन देणे.
पारंपारिक ग्रामीण समाजाला वैज्ञानिक दृष्टिकोन आणि आधुनिक कार्यपध्दती याबाबत अवगत करणे.

**दृष्टीक्षेपात लोकोत्सव -**

- परमपूज्य स.स. श्री. काडसिध्देश्वर स्वामीजी सिध्दगिरी मठ कणेरी यांच्या मार्गदर्शनाखाली श्री क्षेत्र सिध्दगिरी मठ कणेरी महासंस्थान कोल्हापूर येथे दि. २० ते २६ फेब्रुवारी २०२३ या कालावधीत सुमंगलम हा पंचमहाभूत महोत्सव आयोजित करण्यात येणार आहे.
- सदरचा लोकोत्सव ७ दिवसाच्या कालावधीसाठी आहे.
- यामध्ये पंचमहाभूत, आरोग्य आणि रिसायकलींग या ७ विषयाची मांडणी होणार आहे.
- महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा, आंध्रप्रदेश व गुजरातसह २५ हून अधिक राज्यातील लोकांचे आगमन होणार आहे.
- ५० पेक्षा जास्त देशातून पाहुण्यांचे आगमन होणार आहे.
- ३०० पेक्षा जास्त जिल्हयातून विविध संस्था व प्रतिनिधी सहभागी होणार आहेत.
- ५०० पेक्षा अधिक कुलगुरुची उपस्थिती असणार आहे.
- ६५० पेक्षा अधिक एकराच्या परिसरात लोकोत्सवाचे आयोजन केलेले आहे.
- विविध सांप्रदायाचे १००० हून अधिक संत महात्मा आणि योगीजनांचा सहवास लाभणार आहे.
- प्राकृतिक कृषी पध्दतीमध्ये वेगवेगळया पिकांचे प्रत्यक्ष प्रदर्शन देशी बियाणे, जैविक खत, जैविक कीट नियंत्रक व लघु आणि कृषी उपकरणांचे प्रदर्शनांतर्गत १५०० पेक्षा अधिक शेती अवजारे, उत्पादने व विविध वस्तूंचे स्टॉलस असणार आहेत.
- दहा हजाराहून अधिक व्यावसायिकांचे संमेलन व सहभाग असणार आहे.
- संपूर्ण देशातून आलेल्या पारंपारिक वैद्यांचे संमेलन आणि त्यांच्या विशेषज्ञतेचे प्रदर्शन.
- १ लाख स्क्वेअर फूट जागेत मुख्य सभा मंडप असून दररोज सायंकाळी सांस्कृतिक कार्यक्रम.
- २ लाख स्क्वेअर फूट जागेत मनोरंजन जत्रा असणार आहे.
- ३ लाख स्क्वेअर फूट जागेत थ्रीडी मॉडेल्सची मांडणी होणार आहे.
- ३० लाख लोक या उत्सवात सहभागी होतील त्या सर्व लोकांना नि:शुल्क जेवणाची व्यवस्था असणार आहे.
- छत्रपती शिवजयंती आणि पंचमहाभूत लोकोत्सवाच्या पूर्व संध्येला १९ फेब्रुवारीला शोभा यात्रेचे आयोजन.

कणेरी मठाविषयी माहिती -

१) **ग्रामजीवन म्युझियम** - आशिया खंडातील २५ पैकी एक आणि भारतातील ५ पैकी एक हे म्युझियम असून १० एकर परिसरात १००० पेक्षा जास्त मूर्ती असून यामध्ये भारतीय ग्रामीण जीवन पध्दती दर्शविणारे आहे.

२) **गोशाळा** - भारतीय देशी गाईंचे अनन्य साधारण महत्त्व असून मठामध्ये वीस एकरावर पसरलेल्या गोशाळेत २२ प्रजातींच्या ८०० पेक्षा जास्त गाई इथे आहेत.

३) **प्रेरणा पार्क** - १८५७ ते १९४७ असा स्वातंत्र्याचा प्रवास दाखविणारे ऑडिओ-व्हिडीओ-लाईट इफेक्टसह दीड एकरावर तयार करण्यात आलेले ओपन थिएटर पर्यटकांचा केंद्रबिंदू आहे.

४) **सिध्दगिरी प्रॉडक्टस** - सिध्दगिरी महासंस्थानमार्फत ग्राहकांसाठी आयुर्वेदावर आधारित सिध्दगिरी आयुर्वेदिक व सेंद्रीय उत्पादनांची भव्य मालिका उत्पादित करण्यात येते.

५) **आरोग्यधाम**- गोरगरीबांना मोफत किंवा माफक दरात आरोग्यसेवा देण्याच्या हेतून सिध्दगिरी मटाच्या वतीने आयुर्वेदिक आणि आधुनिक उपचार करण्यासाठी ५० बेडचे आयुर्वेदिक आणि १०० बेडचे हॉस्पिटल असून तज्ञ डॉक्टर्स आणि अत्याधुनिक सेवा- सुविधांनी युक्त विविध शासकीय योजना तसेच खाजगी आरोग्य विमा कंपन्याच्या योजना राबविल्या जातात.

६) **कारागीर विद्यापीठ** - प्राचीन भारतीय जीवनसंस्कृतीमधील १० बलुतेदारांचे व्यवसाय आणि कला लुप्त होत असलेने त्याला चालना मिळणेसाठी कारागीर ज्ञानपीठाची स्थापना करण्यात आली असून इथे लाकडी खेळणी, मातीची भांडी, शोभेच्या वस्तू, बांबूकाम, गोधडी, विणकाम, लोहारकाम इ. कौशल्याचे प्रशिक्षण दिले जाते.

७) **सेंद्रीय शेती फार्म** - स्वास्थ्यवर्धक आहार उत्पादनांच्या दृष्टीने सिध्दगिरी मठाने १०० एकर सेंद्रीय शेती फार्म तयार केला असून ५० हजार शेतकऱ्यांना मोफत प्रशिक्षण दिले आहे.

८) **गुरुकुलम** - निसत्व आणि निकामी अशा मेकॉले शिक्षण पध्दतीला सक्षम पर्यायी व्यवस्था म्हणून गेल्या ५ वर्षापासून सिध्दगिरी गुरुकुलम मध्ये अभ्यासक्रम राबविण्यात येत असून हा अभ्यासक्रम नि:शुल्क, निवासी आहे. अर्थनिरपेक्ष, शासनमुक्त व आनंद केंद्रीत पध्दतीने शिकविला जातो. यामध्ये विद्यार्थ्याला परिपूर्ण करणाऱ्या १४ विद्या व ६४ कलांचे प्रशिक्षण दिले जाते.

९) **कृषि विज्ञान केंद्र** - शेतकऱ्यांना सक्षम करण्यासाठी आणि शेतीतील विविध प्रयोग करण्यासाठी सिध्दगिरी मठ येथे कृषि विज्ञान केंद्र सुरु झाले असून मठ आणि परिसरातील हजारो शेतकऱ्यांना सेंद्रीय शेतीसाठी तज्ञांचे मार्गदर्शन मिळते.

१०) **लखपती शेती** - कणेरी येथील सिध्दगिरी मठात एका वर्षाच्या कालावधीत अवघ्या एक एकर जमिनीत १८८ हून अधिक पिक घेण्यात आली. शेतीचे हे प्रशंसनीय स्वावलंबी मॉडेल तयार झाले. ज्याला नंतर लखपती शेती (नफ्यासाठी शेती) म्हणून ओळखले जाते.

११) **दिव्य गार्डन** - प्राचीन भारतीय संस्कृतीवर आधारित रचना असलेने देशातील एकमेव व्हर्टिकल गार्डन असून सहा एकर परिसरात आहे. इथे फुलझाडांची कलात्मक रचना, २००० जातीचे गुलाब, १३५ जातींच्या जास्वंदी, १००० प्रकारचे कॅक्टस, बटरफ्लाय गार्डन, झूलता पूल, विविध देवी देवतांच्या मूर्ती व फुलांनी नटलेली विहीर आहे.

१२) **सामाजिक उपक्रम** - मटामार्फत समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन केले जाते. यामध्ये गो-परिक्रमा उपक्रम, आनंदाश्रम उपक्रम, विद्याचेतना उपक्रम, प्लॅस्टिक मुक्ती, विज्ञान संचारिका उपक्रम, आदर्श ग्रामनिर्माण अभियान, हितेशी उपक्रम इ. अनेक उपक्रम राबविले जातात.

महोत्सवातील नियोजनासाठी बुधवार दि. १८ जानेवारी २०२३ रोजी दु. ३.०० वाजता माध्यमिक विभागाकडील शिक्षक, शिक्षकेतर / मुख्याध्यापक सर्व संघटना (माध्यमिक) अध्यक्ष / सचिव, जिल्हास्तर व तालुकास्तर व मुख्याध्यापक संघाचे सर्व पदाधिकारी यांची बैठक **मुख्याध्यापक संघ कोल्हापूर** येथे आयोजित केली होती. सदर बैटकीमध्ये खालीलप्रमाणे चर्चा झाली.

प्रथम मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष श्री. सुरेश संकपाळ यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले. तद्नंतर कणेरी मटाचे कार्यवाह श्री. प्रल्हाद जाधव यांनी लोकोत्सव सुमंगल कार्यक्रम विषयी सविस्तर माहिती सांगितली. सदर महोत्सवामध्ये लाखो लोकांची उपस्थिती असणार आहे. यामध्ये शिक्षण क्षेत्राचा मोठा सहभाग असणार आहे. **यासाठी खालील मुद्दयांबाबत माध्यमिक शाळांतील मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांना आवाहन -**

१) माध्यमिक विभागाकडील सर्व शाळांतील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी त्यांच्या पालकांसमवेत प्रदर्शन पहावे.

२) यासाठी प्रसार व प्रचार मोठया प्रमाणात करण्यात यावा.

३) या महोत्सवासाठी अंदाजे ५००० स्वयंसेवकांची आवश्यकता आहे. या कामी जे विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी इच्छुक असतील त्यांनी आपली नांवे द्यावीत. मठाच्या आजूबाजूच्या परिसरातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे प्रतिसाद नोंदवावा.

४) सुमंगलम हा पंचमहाभूत महोत्सवाची माहिती सर्व घराघरात पोहोचली पाहिजे यासाठी आपल्याला सेवा स्वरुपाने संदेशवाहकाचे काम करावे. यासाठी संघटनेच्या वतीने जाहिर आवाहन करणेत आले आहे.

५) प्रत्येक विद्यार्थ्यांच्या घरातून म्हणजेच एका कुटुंबातून १ किलो वेस्टेज प्लॅस्टिक गोळा करावे.

६) प्रत्येक गावातून / घरातून एक साडी स्वच्छ धुवून इस्त्री केलेली जमा करावी.

७) प्रत्येक घरातून सुस्थितीत असलेले किमान एक ताट, वाटी व ग्लास जमा करणेत यावीत.

८) प्रत्येक विद्यार्थ्याने अथवा कुटुंबाने एक मूठ मूग व एक मूठ तूरडाळ जमा करावी.

९) वरील जमा करावयाच्या बाबी शाळेमध्ये मुख्याध्यापकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी जमा कराव्यात.

१०) लोकांचा सहभाग वाढविणेसाठी शाळेतून प्रत्येक घरी संदेश पाठविणे.

११) दि. १९ फेब्रुवारी २०२३ रोजी चित्ररथ काढणेत येणार आहे त्यासाठी कोल्हापूर शहरातील १० शाळा सहभागी होतील.

१२) उत्सवामध्ये लेझीम, झांजपथक व ढोल पथक आवश्यक आहेत. इच्छुक शाळांनी आपली नांव नोंदणी माध्यमिक विभागाकडे श्री. आर.व्ही. कांबळे, उपशिक्षणाधिकारी यांचेकडे करावी.

१३) मठाच्या आजूबाजूला सुशोभीकरणासाठी कलाशिक्षकांची आवश्यकता आहे. त्यामुळे या कामी जे कलाशिक्षक इच्छुक असतील त्यांनी शाळेचे काम सांभाळून सुशोभीकरणाचे काम करणेचे आहे.

१४) शाळेकडे जमा झालेले साहित्य संबंधित तालुक्याचे तहसिलदार व गट विकास अधिकारी यांचेमार्फत मठावर साहित्य पोहचविणेसाठी वाहनाची व्यवस्था करुन घ्यावी.

१५) महोत्सवामध्ये खालीलप्रमाणे तालुकानिहाय विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहभागी होणेचे आहे.

| अ.नं. | दिनांक | सहभागी होणारे तालुके |
|---|---|---|
| १ | २०/२/२०२३ | कागल व करवीर |
| २ | २१/२/२०२३ | भुदरगड व राधानगरी |
| ३ | २२/२/२०२३ | हातकणंगले व इचलकरंजी शहर |
| ४ | २३/२/२०२३ | पन्हाळा व शाहूवाडी |
| ५ | २४/२/२०२३ | गडहिंग्लज व आजरा |
| ६ | २५/२/२०२३ | शिरोळ व कोल्हापूर शहर |
| ७ | २६/२/२०२३ | चंदगड व गगनबावडा |

सुमंगलम पंचमहाभूत लोकोत्सव अतिशय मोठया प्रमाणामध्ये साजरा करण्यासाठी कोल्हापूर जिल्हयातील माध्यमिक शाळांतील सर्व विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व मुख्याध्यापक यांनी स्वेच्छेने सहभाग घ्यावयाचा आहे.

(एकनाथ आंबोकर)
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, कोल्हापूर.